# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १८/१०/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. कुही** :– अंतर्गत ०१ कि.मी अंतरावरील मौजा कुही टाऊन सुभाष चौक येथे दिनांक १८/१०/२०२२ चे १०.३० वा. ते १८/१०/२०२२ चे १३.०२ वा. दरम्यान फिर्यादी नामे– अक्षय अरूण लाडेकर (जखमी), वय २३ वर्ष रा. वार्ड क्र. ७ कुही हा त्याचे सलुनच्या दुकानात हजर असतांना आरोपी क्र. १. शरद रामभाऊ शेन्डे, वय २४ वर्ष, रा. वार्ड क्र. ८ कुही व २. सचिन संतोष मडावी, वय २३ वर्ष, रा. बोडकीपेठ, ता. कुही हे फिर्यादीच्या सलुनच्या दुकानात येवुन फिर्यादीस आरोपी क्र.१ ने 'तु माझे मित्राच्या बहिणीला का त्रास देतो, आता तुला मारून टाकतो' असे म्हणुन फिर्यादीस जिवानिशी ठार मारण्याच्या उद्देशाने त्याने त्याच्या जवळचा चाकु काढुन फिर्यादीचे पोटावर, पायावर, छातीवर, वार करून जखमी केले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३०७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि देविदास ठमके मो.क्र. ८७८८५५३१३९ हे करीत आहे.

### घरफोडी

**पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील वानखेडे ले आउट प्लॉट क्रं.२३, पंचशिल भवन मागे चनकापुर येथे दिनांक १७/१०/२२ चे ०७.३० वा. ते १७.३० वा. पर्यंत फिर्यादी नामे– अंजु रमेश तागडे, वय ५० वर्ष रा. वानखेडे ले आउट प्लॉट क्रं.२३, पंचशिल भवन मागे, चनकापुर ता.सावनेर व हिचे पती हे दि. १७/१०/२२ चे १३.०० वा. ते १४.०० वा. दरम्यान त्यांचे राहते घराला कुलुप लावुन नौकरीवर गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे लोखंडी गोदरेज कपाटाचे लॉकर मधुन ठेवलेले नगदी ३८,०००/–रू. व सोन्या–चांदीचे दागिने कि. २९,२५०/–रू. असा एकुण कि. ७१,७५०/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार सुर्यभान जळते मो. नं. ९६७३८३७००७ हे करीत आहे.

# चोरी

**१) पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील लेंडीपुरा कोंढाळी येथे दिनांक १६/१०/२२ चे १८.०० वा. ते १८.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– सौ.अम्रपाली रोशन उके वय ३० वर्षे, रा. वार्ड नं.६ लेंडीपुरा कोंढाळी ता.काटोल हि राहत असलेल्या घराला तसेच घरातील अलमारीला कुलुप न लावता काही कामानिमित्य बाहेर गेली होती. त्यादरम्यान फिर्यादीचे घरातील लोखंडी आलमारीचे कपाटत ठेवलेले सोन्याचे दागिने किमती ४४,०००/–रू. चे अज्ञात आरोपीने चोरून नेले. आज पावेतो फिर्यादीने घरातील कोणीही व्यक्तीने नजर चुकीने कुठतरी ठेवले असतील करीता घरातील व्यक्तीला आजुबाजुचे लोकांना तसेच नातेवाईकात विचारपुस केली परंतु माहिती मिळु शकली नाही. सदर चे दागिने हे अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक गजानन तितरे मो.क्र. ८९९९९०९४२२ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील पोस्ट ऑफीस समोर रामटेक येथे दिनांक १७/१०/२२ चे ११.४५ वा. ते १२.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– वामण केशव बारेजवाडे, वय ५२ वर्ष, रा. मुसेवाडी ता. रामटेक हे स्टेट बॅकेतुन २,००,०००/–रू. विड्राल करून महेंदी रंगाचा बॅगमध्ये ठेवले व आपला हॉनर कंपनीचा मोबाईल कि. ५,०००/–रू. असा एकुण कि. २,०५०००/–रू. बॅगमध्ये ठेवून बॅग हातात घेवून पोस्ट ऑफीस कडे जात असतांना पोस्ट ऑफीस समोर दोन अज्ञात आरोपी हे बाईकवर मागुन आले व फिर्यादीचे लक्ष नसतांना फिर्यादीचे हातातून पैश्याचे बॅग घेवून पळून गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि खोब्रागडे मो. न. ९८९०२२२८४९ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत ०९ कि. मी. अंतरावरील **मौजा** काळाफाटा येथे दिनांक १७/१०/२२ चे ०५.०० वा. सुमारास विधीसंर्घषित बालक वय १४ **वर्ष** याने फिर्यादी नामे– लिलाधर तुकाराम राउत वय ४५ **वर्ष, रा.** काळाफाटा यांच्या घरातील किराणा दुकानातील काउन्टरमध्ये ठेवलेले नगदी ४०,०००/–रू. चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रवि बर्वे **मो.क्रं.** ८८३०५६५०७६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**